आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२५ मे २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहिम नाही, तर निर्धार, धैर्य आणि बदलत्या भारताचं प्रतिबिंब असल्याचं प्रधानमंत्र्यांचं ‘मन की बात’ मधे प्रतिपादन

- नक्षली  कारवायांविरोधातल्या लढ्याबरोबरच दैनंदिन जीवनातल्या विविध विषयांवर साधला संवाद

- कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीतल्या ठेवींवरच्या व्याजाकरता गेल्या वर्षीप्रमाणेच सव्वा आठ टक्के दर जाहीर

- फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेला आजपासून फ्रान्समध्ये प्रारंभ

**आणि**

- खेलो इंडिया बीच स्पोर्ट्स स्पर्धेत काल महाराष्ट्राला १२ पदकांची कमाई / पदकतालिकेत दुसरं स्थान

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर ही केवळ एक लष्करी मोहिम नाही, तर ती आपला निर्धार, धैर्य आणि बदलत्या भारताचं प्रतिबिंब असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.  या कारवाईने जगभरातल्या दहशतवादाविरुद्धच्या लढाईला नवीन विश्वास आणि उत्साह दिला असल्याचं  मोदी यांनी आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमात सांगितलं. आज या कार्यक्रमाचा एकशे बावीसावा भाग प्रसारित झाला. ऑपरेशन सिंदूरमध्ये आपल्या सैन्यानं केलेल्या पराक्रमानं प्रत्येक भारतीयाची मान अभिमानानं ताठ झाली. या कारवाईतली अचूकता अद्भुत असल्याचं ते म्हणाले. त्याचं दर्शन देशभरात तिरंगा यात्रांच्या रुपाने  झाल्याचं ते म्हणाले.

**होल्ड बाईट...**

या मोहिमेत स्वदेशी शस्त्र, उपकरण आणि तंत्रज्ञानाची ताकदही दिसली.

या मोहिमेनंतर संपूर्ण देशात वोकल फॉर लोकल या संकल्पनेलाही नवी ऊर्जा मिळाली आहे. हीच तर भारताची खरी ताकद आहे, या टप्प्यावर प्रत्येक भारतीयानं जिथे शक्य असेल तिथे स्वदेश निर्मित वस्तूंना प्राधान्य देण्याचा निर्धार केला पाहीजे असं आवाहन त्यांनी केलं. ही केवळ आर्थिक आत्मनिर्भरतेची गोष्ट नाही, तर राष्ट्रनिर्मितीतले भागीदार बनण्याची भावना आहे असं ते म्हणाले.

देशाच्या नक्षलग्रस्त भागात मूलभूत सोयी-सुविधा पोहोचू लागल्याचं सांगून गडचिरोली जिल्ह्यातल्या काटेझरी गावात पहिल्यांदाच बस सेवा पोहचल्याचं उदाहरण त्यांनी दिलं. माओवाद्यांच्या प्रभावाखालच्या दंतेवाडामधल्या विद्यार्थ्यांनी दहावीत मिळवलेल्या यशाचा उल्लेखही त्यांनी केला. या बदलांमुळे आपल्याला अभिमान वाटत असल्याचं ते म्हणाले.

आंतरराष्ट्रीय योग दिनाला आता एका महिन्यापेक्षाही कमी काळ उरला असून, प्रत्येकाने आता योगाभ्यासाशी जोडून घ्यावं असं आवाहन त्यांनी श्रोत्यांना केलं. यंदाच्या योगदिनासाठी आपण विशाखापट्टणममधल्या कार्यक्रमात सहभागी होणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

आयुर्वेदाच्या क्षेत्रातही प्रगती होत असल्याचं त्यांनी नमूद केलं. या अनुषंगानंच जागतिक आरोग्य संघटनेच्या महासंचालकांसोबत एक सामंजस्य करार झाला असून, त्यामुळे आयुष उपचार पद्धतीला जगभरात वैज्ञानिक पद्धतीनं पोहोचवता येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

लहान मुलांना लहानपणापासूनच आरोग्यदायी जीवनशैलीच्या सवयी लावण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी केलं.

याअनुषंगानं सीबीएसईच्या शाळांमध्ये मुलांना किती प्रमाणात साखर खावी याबद्दल जागरूक करण्यासाठी शुगर बोर्ड हा उपक्रम राबवला जात असल्याचं

त्यांनी सांगितलं. अशाच प्रकारच्या उपाययोजना सर्व कार्यालयं, उपहारगृह आणि संस्थांमध्येही राबवला गेला पाहीजे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

स्वच्छ भारत तसंच कचऱ्यापासून विशेषतः टाकाऊ कागदापासून पुनर्निमीतीबाबत देशभर होत असलेल्या प्रयत्नांची उदाहरणंही त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. महाराष्ट्रात जालन्यामध्ये १०० टक्के पुनर्प्रक्रिया केलेल्या कच्च्या मालापासून पॅकेजिंग रोल आणि पेपर कोर बनवले जात असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राची अस्मिता, साईराज परदेशी यांच्यासह इतर खेळाडूंनी रचलेल्या विक्रमांची माहिती मोदी यांनी दिली. क्रीडा क्षेत्रातल्या युवा प्रतिभेसाठी स्पर्धा खूप महत्त्वाच्या असतात. अशा स्पर्धांमुळे क्रीडा क्षेत्रातलं भारताचं भविष्य उज्ज्वल होऊ शकेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नुकत्याच साजरा झालेल्या जागतिक मधमाशी दिनाचा उल्लेखही त्यांनी केला. गोडव्यासोबतच आरोग्य, स्वयंरोजगार आणि आत्मनिर्भरतेतही मधाचं योगदान मिळू शकत असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली. गेल्या अकरा वर्षात भारतात मधमाशी पालन क्षेत्रात मधूर क्रांती घडून आली आहे असं ते म्हणाले. दहा अकरा वर्षांपूर्वी भारतातलं मध उत्पादनाचं प्रमाण वर्षाला ७० ते ७५ मेट्रिक टन इतकं होतं आता त्यात वाढ होऊन ते जवळपास सव्वा लाख मॅट्रिक टनांपर्यंत पोहोचलं असल्याची माहिती त्यांनी दिली. मधाचं उत्पादन आणि निर्यातीत आता भारत जगातल्या आघाडीच्या देशांमध्ये पोहचला असल्याचं त्यांनी सांगितलं. राष्ट्रीय मधमाशी पालन आणि मध अभियानाची या यशात महत्वाची भूमिका असल्याचं ते म्हणाले. याअंतर्गतची यशस्वी व्यावसायिक उदाहरणं त्यांनी मांडली. मधाचा गोडवा म्हणजे आत्मनिर्भर भारताचा स्वाद आहे असं म्हणत श्रोत्यांनी

स्थानिकांकडूनच मध खरेदी करण्याचं आवाहन त्यांनी केलं. मधमाशांच्या संरक्षण संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांबद्दल सांगतांना त्यांनी पुणे इथल्या अमित याच्या प्रयत्नांचा उल्लेखही केला. याबद्दल अमित यानं आकाशवाणीकडे आपली भावना व्यक्त केली.

**होल्ड बाईट...**

गेल्या केवळ पाच वर्षांच्या काळातच गुजरातच्या गिर जंगलातली सिंहांची संख्या ६७४ वरून ८९१ झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. वन्यजीव संरक्षणासाठी आपल्याला कायमच जागरूक राहण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. देशभरातल्या ड्रोन दीदींची यशस्वी कामगिरीही त्यांनी आजच्या मन की बात मधून श्रोत्यांसमोर मांडली.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगाने आज गुजरात, केरळ, पंजाब आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधल्या मिळून पाच विधानसभा मतदारसंघांसाठी पोटनिवडणुकांची घोषणा केली. याविषयीची अधिसूचना उद्या जारी होणार आहे. पुढच्या महिन्यात २ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील, ३ जून रोजी त्यांची छाननी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ५ जून असून १९ जून रोजी मतदान तर २३ जून रोजी मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीतल्या ठेवींवरच्या व्याजाकरता केंद्र सरकारने गेल्या वर्षीप्रमाणेच सव्वा आठ टक्के दर जाहीर केला आहे. याचा लाभ देशातल्या सात कोटीपेक्षा जास्त पगारदारांना मिळत आहे. २०२२- २३ मधे कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीतल्या ठेवींवर ८ पूर्णांक १५ शतांश टक्के व्याज मिळत होतं. गेल्या आर्थिक वर्षात ईपीएफओ ने सुमारे २ कोटी १६ लाख रुपयेपर्यंतचे दावे निकाली काढले. ही आजवरची सर्वाधिक रक्कम आहे.

<><><><><>

दीव दमण समुद्रकिनाऱ्यावर सुरू असलेल्या खेलो इंडिया बीच स्पोर्ट्स स्पर्धेत काल पाचव्या दिवशी महाराष्ट्राच्या संघाने पेंचक सिलट प्रकारात ३ सुवर्ण, ४ रौप्य आणि ५ कास्य अशी एकूण १२ पदकांची कमाई करत उपविजेतेपद पटकावलं. बीच सॉकरमध्ये महाराष्ट्र पुरुष संघाने कास्यपदक मिळवलं. ५ सुवर्ण, ५ रौप्य, १० कास्य अशी २० पदकं जिंकून महाराष्ट्र पदक तालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे.

<><><><><>

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेला आजपासून फ्रान्समध्ये सुरुवात होत आहे. या स्पर्धेत रोहन बोपण्णा, युकी भांब्री, एन. श्रीराम बालाजी आणि ऋत्विक चौधरी बोलिपल्ली हे खेळाडू भारताचं प्रतिनिधित्व करतील. पहिल्या फेरीत रोहन बोपण्णा याचा सामना चेक प्रजासत्ताकाच्या ॲडम पावलासेक याच्याशी होईल. पुरुष दुहेरी प्रकाराच्या पहिल्या फेरीत युकी भांब्री आणि त्याचा अमेरिकन जोडीदार रॉबर्ट गेलोवे यांचा सामना नेदरलँड्सचा रॉबिन हासे आणि जर्मनीच्या हेंड्रिक जेबेन्स यांच्याशी होणार आहे. एन. श्रीराम बालाजी आणि त्याचा मेक्सिकन जोडीदार मिगुएल अँजेल रेयेस-वरेला यांचा सामना अर्जेंटिनाचा कॅमिलो उगो काराबेली आणि चीनच्या युनचाओकेट बु यांच्याशी होईल.

<><><><><>

आयपीएल क्रिकेटमध्ये आज दोन सामने होणार आहेत. गुजरात टायटन्सचा सामना चेन्नई सुपर किंग्जबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर दुपारी साडेतीन वाजता होणार आहे. दुसरा सामना दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडीयमवर सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात संध्याकाळी साडेसातवाजता होईल.कालच्या सामन्यात दिल्ली डेअर डेव्हिल्सने किंग्ज इलेव्हनचा ६ गडी राखून पराभव केला.

**<><><><><>**

आज जागतिक थायरॉईड दिवस आहे. थायरॉईडबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी हा दिवस पाळला जातो. थायरॉईड ही मानेमध्ये असलेली एक लहान, फुलपाखराच्या आकाराची ग्रंथी आहे. ही ग्रंथी चयापचय, हृदय गती, शरीराचे तापमान, ऊर्जा, मासिक पाळी यासारख्या महत्त्वाच्या कार्यांचं नियमन करणारी संप्रेरक तयार करते. सक्रिय आणि निरोगी जीवनशैली राखल्यानं थायरॉईडचा धोका कमी होऊ शकतो. थायरॉईड संप्रेरकांच्या उत्पादनासाठी आयोडीनयुक्त मीठ, दुग्धजन्य पदार्थ आणि आयोडीनयुक्त पदार्थ आहारात समाविष्ट करणं आवश्यक आहे.

**<><><><><>**

कोकण आणि गोवा, केरळ आणि माहे, कर्नाटक आणि मध्य महाराष्ट्रात आजपासून २८ मेपर्यंत बहुतेक ठिकाणी हलका ते मध्यम, तर तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मराठवाडा, विदर्भ, तेलंगण आणि दक्षिण गुजरातमध्ये आज आणि उद्या बहुतेक ठिकाणी हलका ते मध्यम आणि तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. दरम्यान, दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात काल रात्री जोरदार पावसानं हजेरी लावली आणि दिल्लीकरांना उकाड्यापासून दिलासा मिळाला.

**<><><><><>**

खराब हवामानामुळे काल रात्री काही विमान उड्डाणाच्या वेळापत्रकावर परिणाम झाल्याचं दिल्ली विमानतळ प्रशासनानं सांगितलं. रात्री साडे अकरा ते पहाटे चार वाजेपर्यंतच्या ४९ विमानांच्या उड्डाणाच्या वेळा बदलण्यात आल्या. यातली १७ आंतरराष्ट्रीय उड्डाणं होती.

**<><><><><>**

केरळमध्ये कोचीजवळच्या समुद्रात बुडालेल्या लायबेरियाच्या एमएससी एलएसए ३ या मालवाहू जहाजावरच्या तीन कर्मचाऱ्यांना भारतीय नौदलाच्या सुजाता या जहाजाने वाचवलं आहे. यात जहाजाचा कॅप्टन, मुख्य तसंच सहाय्यक अभियंता यांचा समावेश आहे.

**//<><><><><>//**